ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १७ वा ❑ भारतीय सौर दिनांक २९ माघ शके १९४७, बुधवार दि.१८ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

दिव्यांग आरक्षणाच्या अंमलबजावणीचा प्रश्न

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी कायदे असूनही, त्यांची अंमलबजावणी करताना हक्कांवर गदा येत असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रात दिव्यांगांसाठी सरकारी नोकरीत ४ टक्के आरक्षण असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. ४० विभागांपैकी अनेकांनी माहिती दडवल्याने आणि बोगस प्रमाणपत्रधारकांनी लाभ घेतल्याने, नियमापेक्षा खूप कमी, म्हणजेच फक्त १.४ टक्के दिव्यांग कर्मचारी कार्यरत असल्याचे समोर आले आहे, ज्यामुळे तुकाराम मुंढे यांनी कारवाईचा इशारा दिला आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार ४ टक्के आरक्षणाची तरतूद आहे, ज्यामध्ये वाढीव पदोन्नती आरक्षणाचाही समावेश आहे. मात्र : ४ टक्के आरक्षणाच्या तुलनेत प्रत्यक्ष कार्यरत प्रमाण केवळ १.४ टक्के आहे.

बहुतांश दिव्यांग आरक्षण हे बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांनी लाटल्याचे आरोप आहेत. माहिती दडपली: दिव्यांग कल्याण विभागाच्या सक्त ताकीदीनंतरही अनेक शासकीय विभागांनी दिव्यांगांची माहिती दडपून ठेवली आहे.

महाराष्ट्रात दिव्यांगांसाठीच्या सवलती आणि हक्कांवर गदा आणल्याच्या घटना समोर आल्या असून, बनावट प्रमाणपत्रे वापरून सवलती लाटणाऱ्यांवर पहिली कारवाई सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे झाली आहे, जिथे निवृत्त वैद्यकीय अधीक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आला. अशा प्रकारांमुळे दिव्यांग व्यक्तींना मिळणारा लाभ रोखला जात आहे.

महाराष्ट्रात दिव्यांगांसाठीच्या सवलती आणि हक्कांवर गदा आणल्याच्या घटना समोर आल्या असून, बनावट प्रमाणपत्रे वापरून सवलती लाटणाऱ्यांवर पहिली कारवाई सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर येथे झाली आहे, जिथे निवृत्त वैद्यकीय अधीक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आला. अशा प्रकारांमुळे दिव्यांग व्यक्तींना मिळणारा लाभ रोखला जात आहे.

बनावट प्रमाणपत्रांचा वापर: अनेक व्यक्ती खोट्या दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे सरकारी योजनांचा फायदा घेत आहेत, ज्यावर विजय कुंभार यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

हक्क डावलणे: नवी मुंबई महानगरपालिकेत अशाच प्रकारे चुकीच्या पद्धतींचा अवलंब करून मूळ हक्कधारकांचे हक्क डावलले जात असल्याचे आरोप नगरसेविका दिव्या गायकवाड यांनी केले आहेत.

दिव्यांगजन हक्क कायदा २०१६ नुसार, भारतात शासकीय नोकऱ्यांमध्ये दिव्यांगांसाठी किमान ४% आरक्षण तरतूद आहे.हे आरक्षण केंद्र आणि राज्य सरकारच्या गट-अ, ब, क आणि ड श्रेणीतील पदांसाठी लागू आहे. यामध्ये अंध, कर्णबधीर, अस्थिव्यंग, स्वमग्नता आणि बहुविकलांग व्यक्तींना (४०% किंवा अधिक दिव्यांगत्व असल्यास) समांतर आरक्षण मिळते.

शासकीय संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महामंडळांच्या पदभरतीत ४% जागा राखीव असतात.

पदोन्नती अपंग कर्मचाऱ्यांना गट-ड ते गट-क पर्यंत पदोन्नतीमध्येही आरक्षण लागू आहे.

शिक्षण: उच्च शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांगांसाठी किमान ५% आरक्षणाची तरतूद आहे.

शैक्षणिक वयोमर्यादा: दिव्यांगांना सरकारी नोकरीत वयोमर्यादेत १० वर्षांची शिथिलता मिळते (सामान्य श्रेणीपेक्षा जास्त)

समांतर आरक्षण: हे आरक्षण अनुसूचित जाती, जमाती, ओबीसी आणि खुला प्रवर्ग या सर्वांमध्ये समांतर पद्धतीने विभागले जाते.

पात्रता: ज्यांच्याकडे सक्षम प्राधिकाऱ्याने जारी केलेले किमान ४०% दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र आहे, ते या आरक्षणासाठी पात्र ठरतात.

तसेच, दारिद्र्य निर्मूलन योजनांमध्ये दिव्यांगांसाठी किमान ३% तरतूद अनिवार्य आहे.

दिव्यांग आरक्षणाच्या जागा रिक्त राहू नयेत यासाठी शासनाकडून विशेष भरती मोहीम राबवण्याचे आदेश दिले जातात, जेणेकरून दिव्यांगांना रोजगाराची समान संधी मिळावी. मात्र दिव्यांग आरक्षण कायद्याची अंमलबजाणी होत नसल्याने वास्तव समोर आले आहे.

दिव्यांग आरक्षणाच्या जागा रिक्त राहू नयेत यासाठी महाराष्ट्र शासनाने ४% आरक्षणासह विशेष तरतुदी केल्या आहेत. पात्र उमेदवार न मिळाल्यास तो अनुशेष पुढील भरती वर्षात ओढला जातो, किंवा आंतर-परिवर्तनाने अन्य दिव्यांग प्रकारातील उमेदवारांची नियुक्ती केली जाते. कंत्राटी भरतीतही हे आरक्षण अनिवार्य केले आहे.आता तरी शासकीय व निमशासकीय स्तरावरील दिव्यांच्या जागा भरून त्या संवर्गाना न्याय दिला पाहिजे

डॉ.दिवाकर कुलकर्णी मांडाखळीकर यांना 'गोविंद सन्मान' जाहीर

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : गरूड ॲडस्चे संस्थापक आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. गोविंद देशपांडे यांच्या स्मृती निमित्त गेली १९ वर्षे स्मृती सोहळ्याचे आयोजन करण्यात येते.

मागील अकरा वर्षापासून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कला व साहित्य क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या मराठवाड्यातील जेष्ठ व्यक्तिस कै. गोविंद देशपांडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'गोविंद सन्मान' बहाल करण्यात येतो. यापुर्वी जेष्ठ पत्रकार गोपाळ साक्रीकर, कादंबरीकार बाबू बिरादार, पत्रकार नागनाथ फटाले, पक्षीतज्ज्ञ डॉ. दिलीप यार्दी, दख्खनी भाषेचे आभ्यासक ॲड. अस्लम मिर्झा, नकाशाकार पंडितराव देशपांडे, प्राचीन इतिहास तज्ज्ञ डॉ. दुलारी गुप्ते -कुरेशी, गोंधळ महर्षी गुलाबराव कदम, जेष्ठ मराठी कवी चित्रकार भ. मा. परसवाळे, पत्रकार मनोहर कुलकर्णी आणि संगीत गुरू विदुषी श्रीमती सीताभाभी रामोहन राव यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

कै. गोविंद देशपांडे — डॉ. दिवाकर कुलकर्णी मांडाखळीकर

बाराव्या 'गोविंद सन्मान' साठी जेष्ठ पशुवैज्ञानिक डॉ. दिवाकर कुलकर्णी मांडाखळीकर यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. रोख ११ हजार रुपये, सन्मानपत्र आणि शाल असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

डॉ. दिवाकर कुलकर्णी मांडाखळीकर गेली चार दशके पशुविज्ञान क्षेत्रात अध्यापनाचे, संशोधनाचे काम करत आहेत. सुक्ष्मजीवशास्त्र विषयाचे प्राध्यापक असलेल्या मांडाखळीकर यांनी राष्ट्रीय उच्चसुरक्षा पशुरोग संस्था, भोपाळ येथे प्रमुख वैज्ञानिक व संचालक म्हणून काम पाहिले आहे. मेंढीरोगास कारणीभूत असलेल्या निलजिव्हा विषाणूचा प्रथम शोध त्यांनी लावला. वटवाघळातून संक्रमित होणाऱ्या निपाह विषाणूवर ९ वर्ष संशोधन केले.

बर्ड फ्लच्यु विषाणूवरील अंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय समित्यांवर त्यांनी काम केले. जागतिक आरोग्य संघटना, कृषी व अन्न संघटना तसेच जागतिक पशुआरोग्य संघटना यांच्या मंच्यावर भारताचे प्रतिनिधीत्व केले. किमान दहा विषाणूवर संशोधन करून १०० हून अधिक संशोधन निबंध लेख अंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे प्रसिद्ध झाले आहेत.

१) संस्कृत भारती देवगिरी प्रांत प्रचार प्रमुख, २) उत्थान गुरूकुल, पुणे संचालक, ३) स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य अभ्यास मंडळ परभणी कार्याध्यक्ष व सचिव म्हणून ते कार्यरत आहेत.

'गोविंद सन्मान' शनिवार, दि २८ मार्च २०२६ रोजी 'गोविंद देशपांडे स्मृति सोहळ्यात' प्रदान केल्या जाणार आहे. अशी माहिती गरुड परिवाराच्या माधुरी गौतम, अनिल पाटील, श्रीकांत उमरीकर, धनंजय दंडवते व नामदेव शिंदे यांनी दिली. गोविंद देशपांडे स्मृति सोहळ्याचे आयोजन गरूड परिवाराच्या वतीने करण्यात येते.

भारतीय संघ इतिहास डिफिट आणि रिपीट करणार ?

ज्योतिर्मय साहित्य

टी २० विश्वचषक स्पर्धेत रविवारी झालेल्या सामन्यात भारताने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवत सुपर ८ मध्ये दिमाखात प्रवेश केला. रविवारी झालेल्या सामन्यात भारताने पाकिस्तानला अक्षरशः चारी मुंड्या चीत केले. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही क्षेत्रात भारताने पाकिस्तानवर वर्चस्व गाजवत हा सामना जिंकला. या सामन्यात पाकिस्तान भारताच्या जवळपासही पोहचू शकला नाही. हा विजय मिळवून भारताने पाकिस्तानवरील वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध केले. विश्वचषकात पाकिस्तान भारताला फक्त एकदाच हरवू शकला.

भारताने मात्र पाकिस्तानला तब्बल ८ वेळा हरवले आहे. या सामन्यात भारताचा सलामीवीर ईशान किशनने वादळी सुरवात करून भारताला पावणे दोनशेचा टप्पा गाठून दिला. त्याने आक्रमक अर्धशतक झळकावले त्याला सूर्यकुमार यादव, शिवम दुबे, तिलक वर्मा, रिंकू सिंग यांनी चांगली साथ दिली. भारतीय गोलंदाजांनी तर कमाल केली. भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानच्या फलंदाजानी अक्षरशः नांगी टाकली. त्यांचा कोणताच फलंदाज भारतीय गोलंदाजीपुढे टिकू शकला नाही. जसप्रीत बुमरा, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव या भारताच्या सर्व प्रमुख गोलंदाजांनी अचूक गोलंदाजी करून पाकिस्तानी फलंदाजांना जेरीस आणले. पाकिस्तानचे फलंदाज कसेबसे शतक पार करून शकले. पाकिस्ताला नमवण्यापूर्वी भारताने अमेरिका आणि नामिबियालाही असेच एकतर्फी नमवून विजय मिळवला होता. आज भारताचा नेदरलँडशी मुकाबला आहे. हा मुकाबला ही भारत एकतर्फी जिंकेल यात शंका नाही. आता भारत सुपर ८ मध्ये पोहचला आहे. विश्वचषकाची खरी लढाई आता सुरू झाली आहे असे म्हणावे लागेल कारण जगातील सर्वोत्तम आठ संघ सुपर ८ मध्ये असतील. तिथे लढाई सोपी नसेल कारण सर्वच संघ जिंकण्यासाठी खेळतील. टी २० क्रिकेटमध्ये कोण जिंकेल हे कोणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही कारण एखादे चांगले षटक किंवा एखादी छोटी पण महत्वपूर्ण खेळी सामन्याचे चित्र पालटवते पण सध्याचा फॉर्म पाहता भारत, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड ऑस्ट्रेलिया आणि वेस्ट इंडीज या संघांना उपांत्य फेरीत पोहचण्याची संधी आहे. न्यूझीलंडही उपान्त्य फेरीत पोहचू शकतो. हेच संघ विजेतेपदाचे दावेदार आहेत मात्र भारत हा विजेतेपदाचा प्रबळ दावेदार आहे कारण या सर्व संघात भारतीय संघ तुफान फॉर्मात आहे. भारताची फलंदाजी इतर कोणत्याही देशांच्या फलंदाजी पेक्षा बळकट आहे. भारताचे गोलंदाजही लयीत आहेत. भारताचे वेगवान गोलंदाज असोत की फिरकी गोलंदाज सर्वच प्रतिस्पर्धी फलंदाजावर भारी पडत आहे. भारताचे क्षेत्ररक्षणही चांगले होत आहे. सूर्यकुमार यादव हा या संघाचे नेतृत्व कुशलतेने करत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे भारत आपल्या प्रेक्षकांसमोर आणि घरच्या मैदानावर खेळत आहे त्यामुळे त्याचा फायदा भारतीय संघाला मिळत आहे. याचाच अर्थ सर्व परिस्थिती भारतासाठी अनुकूल आहे. भारतीय संघाने या अनुकूल परिस्थितीचा फायदा उचलून संघाला विश्वविजयी करावे अशी अपेक्षा देशातील १४५ कोटी जनता करत आहे. भारताने जर तसे केले तर इतिहास घडेल. जर भारताने हा विश्वचषक जिंकला तर तीनवेळा विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरेल. याआधी असा पराक्रम कोणत्याही संघाने केला नाही याचाच अर्थ भारत इतिहास डिफिट करेल शिवाय सलग दोनदा विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिला संघ ठरेल. म्हणजेच सलग दुसऱ्यांदा विश्वचषक जिंकून भारत इतिहासाची पुनरावृत्ती करेल म्हणजेच इतिहास रिपीट करेल. इतिहास डिफिट आणि रिपीट करण्यासाठी भारतीय संघाला

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

कुलस्वामिनी येथे महाशिवपुराण कथेस भक्तांचा प्रचंड प्रतिसाद !

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : दि. १२ ते १८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कुलस्वामिनी मंगल कार्यालय, एन-६ बजरंग चौकाजवळ, सिडको, छत्रपती संभाजीनगर येथे दररोज शिवमहापुराण कथा संपन्न होत आहे.

हे आयोजन श्री श्याम जनकल्याणार्थ मनुश्री चॅरिटेबल ट्रस्ट, खाटूश्यामजी यांच्या सहकार्याने द्वादश ज्योतिर्लिंग कथा यात्रेच्या क्रमामध्ये शहरात श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग शिवमहापुराण कथेचे भव्य व भक्तिमय आयोजन करण्यात आले आहे.

या पवित्र कथेचे रसाळ कथन राष्ट्रीय कथाकार श्री मनुश्री महाराज (रत्नागडवाले) यांच्या पावन मुखातून होत असून, भाविकांसाठी ही एक अलौकिक पर्वणी ठरत आहे.या कथेचे थेट प्रक्षेपण संस्कार टीव्ही वाहिनीवर सुद्धा होत आहे.महाशिवरात्रीच्या पावन दिनानिमित्त विशेष चार प्रहर शिवाभिषेक धार्मिक विधीही आयोजित करण्यात आला असून, यासाठी प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे. यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघत आहे.

महाशिवपुराण मुळे सिडको परिसरात भक्तीमय व आध्यात्मिक वातावरण निर्माण होत आहे. आज शंकर-पार्वती विवाह संपन्न झाला. दि. १८ ला सकाळी १० ते १ पर्यंत भक्तिमय संगीत, फुलांची होळी खेळण्यात येऊन सांगता होणार आहे. सौ कमल व कृष्ण गायकवाड परिवार हे यजमान असून कुलस्वामिनी प्रतिष्ठानचे सौ अलका व विलास कोरडे व इतर सर्व समाजाचे भक्त मंडळी दररोज उपस्थित आहेत.

साहित्य आणि संस्कृतीचा अनोखा संगम - 'साहित्योत्सव'

साहित्य म्हणजे केवळ कथा-कवितांचा संग्रह नव्हे; ते समाजाच्या आत्म्याचे भाष्य आहे. आणि जेव्हा साहित्य संस्कृतीच्या सहवासात येते, तेव्हा निर्माण होतो एक उत्सव! हा उत्सव विचारांचा, सृजनाचा आणि नवचैतन्याचा...
अशा या प्रेरणादायी वातावरणाची निर्मिती करणारा सोहळा म्हणजे 'साहित्योत्सव-२०२६' - जागर साहित्याचा... युवा मनांचा... अर्थात जागर राष्ट्रनिर्मितीच्या स्वप्नांचा!

■ 'साहित्योत्सव'... सृजनाचा उत्सव...
साहित्य भारतीचा 'साहित्योत्सव' हा केवळ कार्यक्रम नाही; तो एक अनुभव आहे. येथे शब्द फक्त वाचले जात नाहीत, तर ते जगले जातात. येथे विचार फक्त मांडले जात नाहीत, तर ते मनामनांत झिरपतात. हा उत्सव नवोदित आणि प्रगल्भ, पारंपरिक आणि आधुनिक, ग्रामीण आणि शहरी, सर्वांना समान विचारपीठ देतो. कारण साहित्याला सीमा नसतात; ते मनाच्या आकाशात मुक्तपणे उडते...

■ युवा साहित्यिक - उद्याच्या विचारविश्वाचे शिल्पकार...
'साहित्योत्सव'मध्ये आयोजित कविता, कथा, निबंध आणि नाट्यछटा लेखन स्पर्धा म्हणजे या सृजनशीलतेला दिलेले खुले आमंत्रण आहे...
एखादा तरुण जेव्हा पहिली कविता लिहितो, तेव्हा तो फक्त शब्द रचत नसतो, तर तो स्वतःला शोधत असतो. एखादी कथा जन्माला येते, तेव्हा त्यात अनुभवांचे धागे विणलेले असतात. निबंधातून विचारांची मांडणी होते, तर नाट्यछटांमधून समाजाचे प्रतिबिंब उभे राहते.

■ स्त्री लेखिकांची अभिव्यक्ती- नव्या युगाचा स्वर
"२१ व्या शतकातील स्त्री लेखिकांची अभिव्यक्ती" या चर्चेतून आधुनिक साहित्याचा एक महत्त्वपूर्ण प्रवाह उलगडतो. आजची स्त्री केवळ शब्दांचा खेळ मांडत नाही; ती स्वतःच्या अस्तित्वाची कथा सांगणारी लेखिका आहे.
तिच्या लेखणीत स्वातंत्र्य आहे, संघर्ष आहे, प्रेम आहे, प्रश्न आहेत आणि परिवर्तनाची आस आहे. ती परंपरेचा आदर राखत नव्या वाटा शोधते. तिच्या शब्दांत कोमलता असली तरी त्यात ताकदही तितकीच आहे.

■ आजचे युवा साहित्य-दिशेचा शोध
आजचा युवकांच्या हातात संपूर्ण विश्व सामावले आहे. मोबाईलच्या एका स्क्रीनवर. पण या अमर्याद माहितीच्या महासागरात साहित्याची दिशा काय असावी? "आजचे युवा साहित्य कुठे चालले आहे?" या चर्चेतून आधुनिकतेचे आव्हान आणि संधी दोन्ही समोर येतात.

■ उपक्रमांची रंगत- विचार आणि आनंद यांचा मिलाफ
'साहित्योत्सव'ची खासियत म्हणजे त्याची बहुरंगी रूपे. अभिरूप न्यायालय समाजातील प्रश्नांना सर्जनशील पद्धतीने मांडत न्याय, नैतिकता आणि जबाबदारी यांवर विचार करायला भाग पाडते.
कवी संमेलन म्हणजे भावनांचा झरा... जिथे शब्द सुरांत मिसळतात आणि श्रोते मंत्रमुग्ध होतात.
कवी कट्टा मुक्त अभिव्यक्तीचा कोपरा आहे... बंधने नाहीत, फक्त विचारांचा प्रवाह आहे...
अनोखी ग्रंथदिंडी ज्ञानाची पालखी घेऊन समाजातून फिरते आणि वाचनसंस्कृतीचा उत्सव साजरा करते. पुस्तकांविषयीचा आदर आणि प्रेम यांची ही सुंदर परंपरा आहे. "महाराष्ट्राची लोकधारा" या सांस्कृतिक कार्यक्रमातून मातीचा सुगंध दरवळतो... लोकगीते, नृत्य, परंपरा आणि जीवनाची सहजता यांचा अविष्कार घडतो...

■ साहित्योत्सव - एक चळवळ...
हा उत्सव एका दिवसापुरता मर्यादित नाही; ती विचारांची चळवळ आहे. प्रत्येक सहभागीच्या मनात एक ठिणगी पेटवणारी... काहीतरी लिहावे, काहीतरी वाचावे, काहीतरी बदलावे... अशी प्रेरणा देणारी.
कारण शेवटी राष्ट्राची उभारणी केवळ दगड मातीच्या इमारतींनी होत नाही; तर ती विचारांनी होते. आणि विचार घडवण्याचे सामर्थ्य साहित्यात आहे.
अंततः 'साहित्योत्सव' म्हणजे शब्दांचा सोहळा, संस्कृतीचा उत्सव आणि भविष्याचा दीपस्तंभ! येथे मनांना दिशा मिळते, विचारांना पंख आणि स्वप्नांना आकाश...
चला, या शब्दयात्रेत सहभागी होऊया.
लेखन करूया... वाचन करूया... विचार करूया...
कारण, जिथे साहित्य जागते, तिथे समाज जागतो;
जिथे संस्कृती फुलते, तिथे राष्ट्र उभारते...
आणि म्हणूनच 'साहित्योत्सव' म्हणजे केवळ उत्सव नाही, साहित्य आणि संस्कृतीचा तो संगम आहे... तो नवभारताच्या स्वप्नांना शब्द देणारा प्रकाशोत्सव आहे!
२०,२१,२२ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर या ऐतिहासिक नगरीत होणाऱ्या अनोख्या साहित्योत्सवात मी सहभागी होऊन या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होत आहे. आपणही हा ऐतिहासिक क्षण अनुभवावा...

साहित्य भारती, देवगिरी प्रांत आणि श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने अनोख्या साहित्योत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. युवा साहित्यिकांना एक व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि सृजनशीलतेला वाव मिळावा, हा या उपक्रमामागील उद्देश !
दि. २१ आणि २२ फेब्रुवारी २०२६ रोजी
स्थळ - श्री सरस्वती भुवन शिक्षण संस्थेच्या परिसर

जात्यावरच्या ओव्या.....

न्हाणीघरापाशी
रिठे वाटून ठेवले
लेकी सुनाच्या केसाला
आणले सुगंधी मसाले ||५०४||

न्हाणीघरापाशी
बाळ रांगत आल
लाडक्याला मामान
मांडीवर न्हाणल ||५०५||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनाचे श्लोक – एक सार्वकालिक मनोपनिषद

ज्योतिर्मय साहित्य

मला नेहमी प्रश्न पडतो की, समर्थांनी मनाला उद्देशून बोलताना मना सज्जना अशी साद का घातली असावी ? पण आपण मनाचे श्लोक जेव्हा वाचतो किंवा अभ्यासतो तेव्हा लक्षात येते की समर्थ रामदासांचा मानवी मनाचा अभ्यास खूप मोठा आहे. आपले मन हे अत्यंत चंचल आहे. ते जसे अधोगतीला नेऊ शकते, तसेच ते मोक्षाचा मार्गही प्रशस्त करू शकते. म्हणूनच समर्थांनी मनाला सज्जन संबोधून प्रथम त्याच्यातील सात्विकतेला जागृत केले आहे. आपल्याकडे घरात आई-वडील जेव्हा मुलांना समजून सांगतात तेव्हा शहाणी मुले असं करत नाहीत असं म्हणतात म्हणजेच ते शहाणा म्हणून आपल्यातील चांगुलपणाला आवाहन करतात. समर्थांनी देखील आपल्या मनाला तशाच प्रकारचे आवाहन केले आहे.

समर्थांच्या या रचनेला मला या मनोपनिषद म्हणणे अधिक योग्य वाटते, कारण उपनिषदांचा गाभा असलेल्या ब्रह्मविद्येला समर्थांनी अत्यंत सोप्या भाषेत जनसामान्यांच्या उंबरठ्यापर्यंत आणले आहे. जिथे उपनिषदे तत्वमसि (ते तूच आहेस) असा गहन संदेश देतात, तिथे समर्थ मना सज्जना राघवी वस्ति कीजे असे सांगून त्या तत्त्वाची अनुभूती घेण्याचे साधन आपल्याला देतात. मनाला शिस्त लावणे, षडरिपूंवर विजय मिळवणे आणि विवेकाच्या साह्याने जगणे, ही या मनोपनिषदाची प्रमुख सूत्रे आहेत.

या लेखमालेत आपण समर्थांच्या मनाचे श्लोक – मनोपनिषद या अजरामर कृतीचा धांडोळा घेणार आहोत. त्यातून आपल्या मनाचे नियमन कसे करावे, सात्विकतेचा ध्यास कशा प्रकारे घेता येईल आणि अध्यात्मिक उन्नतीचा मार्ग कसा प्रशस्त होईल हे समजण्यासाठी मदत होईल.

यात समर्थांनी केवळ भक्ती नाही, तर विवेक (योग्य-अयोग्य निवडण्याची शक्ती) वाढवण्यावर भर दिला आहे. मनात चालणाऱ्या सुख-दुःख, आशा-निराशा यासारख्या द्वंद्वांवर कशी मात करावी हे यातून सांगितले आहे. तसेच परमेश्वर प्राप्तीचा किंवा साधनेचा सोपा मार्ग समर्थ या श्लोकातून आपल्याला सांगतात. कठीण योगाभ्यासापेक्षा नामस्मरण आणि सदाचार यातून मन शुद्ध होते यावर त्यांचा भर आहे. आजच्या काळात जेव्हा समाज स्वत्व विसरला आहे, नैतिक मूल्यांचा पाया डळमळीत झाला आहे अशा परिस्थितीत समाजाला नैतिक अधिष्ठान प्राप्त करून देण्यासाठी मनाच्या श्लोकांची फार मोठी मदत होऊ शकेल. ज्याप्रमाणे शरीर शुद्धीसाठी व्यायामाची गरज असते, तशी चित्तशुद्धीसाठी या श्लोकांची गरज आहे असे मला वाटते. मनाच्या श्लोकातील प्रत्येक श्लोकाला सुभाषिताचे मोल आहे. आपण ठरवले तर प्रत्येक श्लोक हा एक अमीट मानसिक संस्कार होऊ शकतो.

(क्रमशः)





श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

भगवत्कृपेचा लोंढा म्हणजे काय ?

ज्योतिर्मय साहित्य

कोणतेही बी पेरताना ते अत्यंत शुद्ध असावे; म्हणजे किडलेले किंवा सडलेले नसावे. भगवंताशिवाय दुसऱ्या कोणत्याही फळाच्या हेतूने केलेली भक्ती ही सडलेल्या बीजासारखी आहे. आता, सुरुवातीलाच उत्तम बी पैदा होईल असे नाही, परंतु प्रयत्नाने ते साधता येते. पुष्कळ वेळा काही तरी ऐहिक सुखाच्या इच्छेने मनुष्य भक्ती करायला लागतो; म्हणजे त्यावेळी तो सडके बी पेरीत असतो. प्रारंभी अशा तऱ्हेचे काही तरी निमित्त होतच असते, परंतु थोड्याशा विचाराने, शुद्ध बीजाची पेरणी होणे जरूर आहे असे चित्ताला पटते. भगवंताची तशी अनन्य भावाने प्रार्थना करावी. पाऊस पडणे वा न पडणे ही गोष्ट सर्वस्वी भगवंताच्या स्वाधीन आहे, आणि तो यथाकाळ पाडतोही. असे पाहा की, एखादे शेत खोलात असले की त्यात पाणी इतके साचते की, ते जर बाहेर काढून लावले नाही तर सबंध पीक कुजून जाते. त्याच अर्थाने भगवंताच्या कृपेचा लोंढा जर जोराचा असला तर बंधारा फोडून तो बाहेर सोडणेच जरूर असते. असे करण्यात दोन्हींकडून फायदा असतो. एक म्हणजे शेतात जास्त झालेले पाणी बाहेर काढून लावल्याने शेतातले पीक न कुजता शेत उत्तम वाढते; आणि दुसरे म्हणजे, ते बाहेर घालविलेले पाणी आजूबाजूच्या शेतात पसरून तिथलेही पीक वाढवायला मदत होते. बंधारा फोडून पाणी बाहेर लावणे याचेच नाव परोपकार. साधकाची जशी प्रगती होत जाईल त्याप्रमाणे मध्यंतरी सिद्धी प्राप्त होऊन, बोललेले खरे होणे, दुसऱ्याच्या मनातले समजणे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अदृश्य गतीने जाणे, इत्यादि प्रकार घडू लागतात. अशा वेळी मोहाला बळी न पडता, त्यांचा उपयोग स्वार्थाकडे न होईल अशी खबरदारी घेणे जरूर असते. उपयोग करायचाच झाला तर दुसऱ्याचे काम करण्यात, परोपकारांत व्हावा; यालाच बांध फोडून पाणी बाहेर लावणे असे म्हणता येईल.

शहाण्या माणसाने आपले सुख बाहेरच्या वस्तूवर अवलंबून न ठेवण्याचा अभ्यास करावा. बाहेरची वस्तू सुटली तरी मनाला दुसरी वस्तू देणे अवश्य असते. अशी वस्तू म्हणजे भगवंत होय. भगवंत हा नेहमी राहणारा, स्वयंपूर्ण, आणि आनंदमय असल्यामुळे त्याचे चिंतन करता करता मनामध्ये ते गुण उतरतात. अर्थात् मन भगवंताच्या चिंतनाने आनंदमय बनल्यावर त्या माणसाला जीवन किती रसमय होत असेल याची कल्पना करावी. मी त्याचा आहे आणि हे सर्व त्याचे आहे अशी सारखी जाणीव पाहिजे. किती आनंद आहे त्यात !

शुद्ध अंतःकरण ठेवून नाम घेतले तर भगवंताच्या कृपेचा अनुभव येईल.

श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

दिवस पहिला

पुढे.....

ज्ञान कर्म भक्ती ही माणसाच्या जीवनाशी स्वाभाविक पणे जोडलेली आहे.माणूस कर्म करायचे नाही हे ठरविले तरी कर्म घडणारच. देह आहे पण कर्म नाही, तर त्याला प्रेत म्हणतात.ज्याला कांहीं कळत नाही त्याने हात वर करा असे म्हटले तर सहसा कोणी हात वर करणार नाही, पण एखाद्याने केलाच, तरी कांहीं कळत नाही तर ,हात वर करावा हे तरी त्याला कळालेच ना?म्हणजे ज्ञान आहेच. मनुष्याला कर्म ज्ञान तसे भक्तीही आहे.कुठेतरी तो समर्पित असतो,देवाला नसले तरी विचारांना असेल. कर्माची अगतिकता ज्ञान्याची गरज व भक्तीची..समर्पन यांची गरज आहे. नुसते कर्म वा नुसते नुसते ज्ञान उपयोगी नाही. त्याला भक्तीची जोड हवी.ज्ञान हे कार्यातून व्यक्त होते. कर्माला ज्ञानाचे डोळे हवेत.आंधळेपणानी कर्म नको या दोन्हिच्या मुळाशी श्रद्धा असावी लागते.निश्काम कर्मातून ज्ञानाची अभिवृद्धी असते. कर्म व ज्ञान दोन्हीही लागते.

जीवनामध्ये नुसते कर्म,किंवा नुसते ज्ञान चालत नाही.ज्या कर्मातून पाप वा पुण्य दोन्ही निर्माण होत नाही, त्याला निष्काम कर्म म्हणतात.

समुच्चय व समन्वय या दोन संकल्पना आहेत.दोन साधनांचा परस्पर संबंधही नाही त्याला समुच्चय म्हणतात.रेल्वेचे रुळ.स्वतंत्र असुन गरजेचे.दोन साधनांचा परस्पर संबंध आहे त्याला समन्वय म्हणतात.

या ध्येय,साधन व कर्म यांचा समन्वय भागवत शिकविते.

बाकी भाग उद्या पाहू..

दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

श्रवणनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

दशक ७ समास ८

नमस्कार

मित्रांनो आपल्याला परमार्थाकडे जायचें आहे परमात्मा ओळखायचा आहे तिकडे जाण्यासाठी मार्ग दाखवण्यासाठी वाटाडा लागतो तो वाटाडा कोण ? असा प्रश्न तुम्हाला पडला असेल तर !

संत हे त्याचे ऊत्तर आहे मित्रांनो. अशा संतांना आपण वंदन करूया

भक्तिमार्गाचा रस्ता सुलभ होण्यासाठी श्रवण, मनन, निदिध्यास यांची गरज असते. समर्थ श्रवण हा शब्द फार व्यापक अर्थाने मांडतात. उपनिषदांमध्ये सांगितलेला आत्मदर्शनाचा मार्गच श्री समर्थांनी आपल्यालादासबोधा मध्येसांगितला आहे. आपण सतत मनन, चिंतन श्रवण भक्तिने परमार्थाकडे वळतो व आपल्या आयुष्यात परमानंद मिळवतो. श्रवणभक्तिचा हा फायदा आहे. ज्ञानमार्ग, योगमार्ग, भक्तिमार्ग, शक्तिमार्ग असो, मनाची संपूर्ण एकाग्रता होऊन ध्यानावस्थेत एकत्र गोळा होणारें मन हे काही अचानक तयार होत नाही त्यासाठी त्याच्यावर ध्येयाचें संस्कार सतत करावे लागतात. ध्येय हे काही बाजारात जाऊन खरेदी करायची वस्तू नाही मित्रांनो, की बाजारात जाऊन एक किलो ध्येय द्या असे आपण म्हणू शकत नाही त्यासाठी निदिध्यास असणें गरजेचे आहे. ध्येयाचे संस्कार सतत सत्संगात राहिल्याने होतात. त्यासाठी सतत कानावर आदर्शवत विचार बालपणापासून रूजवले गेले पाहिजेत. घरातील वातावरण सात्विक, परोपकारी, ऊच्चध्येयमुल्ये जोपासणारे असावे लागते. (क्रमशः)

डोळ्याला चष्मा-नजर कमजोर? एक ग्लास दुधात हा पदार्थ घालून रोज प्या, नजर होईल तेज.....

ज्योतिर्मय साहित्य

डोळ्यांना चष्मा नको वाटतो, चशष्म्यामुळे नाकावर खुणा उमटतात अशी बऱ्याचजणांची समस्या असते. काही सोपे व्यायाम करून तसंच खाण्यापिण्यात बदल करून तुम्ही डोळ्यांचे आरोग्य सुधारू शकता. बनारस हिंदू युनिव्हर्सिटीनं असा एक उपाय शोधलाा आहे. ज्यामुळे रेटीनाचे नर्व्स ट्रॅक करून आरोग्याच्या समस्यांची माहिती मिळू शकते. मायोपिया. ड्राय आय सिंड्रोम आणि ग्लुकोमा यांसारख्या डोळ्यांच्या समस्या उद्भवू शकतात.

जर तुम्हाला वयाच्या चाळिशीत किंवा त्याआधीच डोळ्यांच्या समस्या उद्भवत असतील किंवा तुम्हाला धुसर दिसत असेल किंवा डोकं दुखत असेल तर ग्लुकोमा या आजाराची सुरूवात असू शकते. शुगर पेशंट्सनी हे आजार टाळण्यासाठी अजून काळजी घ्यायला हवी. डायबिटीसच्या आजारानं जगभरातील सव्वा कोटीपेक्षा जास्त लोक त्रस्त आहेत.

रिर्पोटनुसार जर तुम्हाला चष्मा काढायचा असेल तर अधुनिक शस्त्रक्रिया हा सर्वोत्तम उपाय आहे. यात लेझरच्या साहाय्यानं कॉर्नियाचा आकार बदलला जातो. हे अत्यंत सुरक्षित आणि लोकप्रिय आहे. ज्यांचा कॉर्निया पातळ असतो त्यांच्यासाठी हा पर्याय निवडला जातो. ही एक प्रगत आणि मिनिमली इन्व्हेसिव्ह पद्धत आहे. जर तुमचा नंबर खूप जास्त असेल तर डोळ्यात कायमस्वरूपी लेन्स बसवली जाते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी घरगुती उपाय कोणते...?

डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी तुम्ही काही सोपे उपाय करू शकता जसं की सकाळी आणि संध्याकाळी ३० मिनिटं प्राणायम करा. अनुलोम-विलोम आणि भ्रामरी हे व्यायामसुद्धा डोळ्यांसाठी फायदेशीर ठरतात.

डोळे चांगले ठेवण्यासाठी महा त्रिफळा घृत पिणं फायदेशीर ठरतं...

१ ग्लास दूधासोबत १ चमचा हे चूर्ण घ्या. दिवसातून २ वेळा हा उपाय केल्यास चांगला परिणाम दिसून येईल.

एलोवेरा ज्यूस, आवळ्याचा ज्यूस डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते. तुम्हाला तुमचे डोळे चांगले ठेवायचे असतील तर नेहमी मोबाईल वापरण्याची सवय सोडायला हवी. योगगुरू बाबा रामदेव यांनी सांगितलेले उपाय तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकतात. गाजर, रताळे, स्ट्रॉबेरी, आवळ्याचे सेवन डोळ्यांचे आरोग्य चांगले ठेवण्यासाठी फायदेशीर ठरते.

***



हैदराबाद स्वातंत्र्यलढा हा इतिहासाचे सोनेरी पान-प्रा.डॉ. वि ल धारूरकर

ज्योतिर्मय साहित्य

जालना - हैदराबादचा स्वातंत्र्यलढा म्हणजे भारतीय इतिहासातील एक महत्त्वाचे सोनेरी पान होय. १९४८ स्वातंत्र्यलढा यशस्वी ठरल्यामुळे अखंड भारताच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले गेले असे मत माजी कुलगुरू आणि इतिहास संशोधक डॉ. वि ल धारूरकर यांनी व्यक्त केले. स्वामी रामानंद तीर्थ हे योद्धे कर्मयोगी होते. ते क्रांतिकारक असले तरी त्यांना प्रभावी अध्यात्मिक बैठक लाभलेली होती.डॉ.धारूरकर हे जालना येथील डॉ.सुभाषराव ढाकणे विधी महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने आयोजित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेत बोलत होते, याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्रशासकीय अधिकारी प्रा.शरद कवानकर हे होते. या व्याख्यानमालेचे यजमानपद यावेळी डॉ.ढाकणे विधी महाविद्यालय रोहनवाड़ी, जालना यांच्याकडे होते. प्रारंभी विधी महाविद्यालयातील प्रा.सचिन निसर्गन यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि प्रास्ताविक भाषण केले त्यानंतर आपल्या भाषणात डॉ.वि ल धारूरकर पुढे म्हणाले की प्राचीन मराठवाड्याचा इतिहास हा शालिवाहन काळ वाकाटक काळ आणि राष्ट्रकूट काळात संपन्न होता. शालीवाहन व वाकाटक काळात या भागात स्वर्णयुग नांदत होते, या प्रदेशातील प्रतिष्ठान भोगवर्धन, तगरपुर ही आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्र होती. अजिंठा चित्रशैली ही तर सुवर्ण युगाची साक्ष देते. यादवांच्या उत्कर्ष काळात १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी याने देवगिरीवर आक्रमण केले तेव्हापासून मराठवाडा प्रदेशात अंधकार पसरला. १९४८ मध्ये हैदराबाद मुक्तिसंग्रामानंतर मराठवाडा प्रदेश परकीय आक्रमणातून मुक्त झाला. ७०० वर्षे परकीय सत्तेशी लढून मराठवाडा प्रदेशातील स्वातंत्र्यप्रेमी जनतेने आपली अस्मिता राखली आणि संघर्षातून राष्ट्रीयत्व सिद्ध केले. मुगल सम्राट औरंगजेब याचा भाचा असलेल्या निजाम उल मुल्क याने मोघला विरुद्ध बंड करून असंफिया घराण्याची स्थापना केली, त्याचे राज्य १९२९ ते १९४८ पर्यंत कायम होते परंतु या काळात स्थानिक प्रजेवर झालेल्या अन्याय अत्याचारामुळे १८५७ पासून जागृतीची लाट निर्माण झाली. १८५७ ते १९३४ पर्यंत प्रारंभी सामाजिक व सांस्कृतिक चळवळी जोर धरू लागल्या, गणेशोत्सव व शिवजयंती, सार्वजनिक ग्रंथालय,

राष्ट्रीय शिक्षण संस्था या माध्यमातून जागृती झाली.निजाम विजय आणि मराठवाडा या वर्तमान पत्रातून हैदराबाद संस्थानातील लोकस्थितीचे दर्शन घडते.संस्था म्हणजे जणू प्रचंड मोठा तुरुंग बनलेला होता. लोकांना विचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य,वृत्तपत्र स्वातंत्र्य मुळीच नव्हते. १९३४ ते ४८ या कालखंडात मराठवाडा प्रदेशात आर्य समाज, हिंदू महासभा आणि स्टेट काँग्रेस च्या वतीने सत्याग्रहाचे महापर्व सुरू झाले,या कालखंडात स्वामी रामानंद तीर्थ यांचा परतुर महाराष्ट्र परिषदेत उदय झाला त्यांनी स्टेट काँग्रेसची स्थापना केली परंतु जन्माआधीच तिच्यावर बंदी आली तथापि संस्थानातील इतर प्रदेशाच्या तुलनेत मराठवाडा प्रदेशातच सत्याग्रह अधिक झाले असे सांगून डॉ. धारूरकर पुढे म्हणाले की स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाला एक आध्यात्मिक बैठक होती. त्यांनी हिप्परगा येथील ओढ्यामध्ये संन्यास घेतला आणि खेडगीकरांचे स्वामी रामानंद तीर्थ झाले.महात्मा गांधी यांची भेट घेऊन स्वामीजींनी त्यांच्याकडून निजामाविरुद्ध सशस्त्र लढा करण्यास अनुमती मिळविली.हैदराबादचा लोक लढा ऐरणीवर आला असताना सरदार वल्लभ भाई पटेल यांनी लष्करी कारवाईचा निर्णय घेतला आणि पाच दिवसात निजामाचा पाडाव केला. स्वातंत्र्यलढ्यातील सर्वसमावेशक लोकसहभाग हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय असेअसे सांगून डॉ.धारूरकर पुढे म्हणाले दलित शोषित महिला या सर्वांच्या सहभागामुळे हैदराबादचा लढा लोकलढा बनला आणि तो इतिहासात अमर झाला. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा.कवानकर यांनी हैदराबाद लढ्याचे ऐतिहासिक महत्त्व स्पष्ट केले. प्राचार्य क्रांतिलक्ष्मी मुदिराज यांनी हा विषय अभ्यास व संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे असे सांगितले.शेवटी व्याख्यानमाला समन्वयक प्रा.सचिन निसर्गन यांनी सर्वांचे आभार मानले.याप्रसंगी विधी महाविद्यालयातील उपप्राचार्य धनश्री मांटे, प्रा.सुभाष बोर्डे,प्रा. नीलम जैस्वाल,प्रा.सुषमा आसूटकर,प्रा.संदेश तुपे,प्रा.संदीप पटेकर,सागर गाडपकर,शुभम कुंटे,पवन राऊत,प्रदीप ढाकणे,केदारनाथ पितळे,गंगाधर माळी,मनीषा लहाने व विद्यार्थी तसेच नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

कंपाऊंड इंटरेस्ट अर्थातच चक्रवाढ व्याज

शेअर गुंतवणूक क्षेत्राचे पितामह म्हणून ओळखले जाणारे श्री वॉरेन बफे यांच्या मते कंपाऊंडींग हे आठवे आश्चर्य आहे. मित्रांनो चक्रवाढ व्याज हे आपण पाचव्या सहाव्या इयत्तेत कधीतरी शिकलो आहोत.
पण त्याचा वापर फक्त व्याज बट्ट्याचा धंदा करणाऱ्या सावकार मंडळींनाच करता आला...आणि आपण परीक्षेत चक्रवाढ व्याजाचे गणित करून दोन चार मार्क मिळवण्यासाठी केला (खरेतर ज्यांचे गणित चांगले असेल त्यांनीच).
तर व्याजाच्या वर मिळणारे व्याज म्हणजे चक्रवाढ व्याज.
काही गोष्टी, कोंडी या संबंधात प्रसिद्ध आहेत.. त्या आधी गोष्ट सांगतो... कदाचित तुम्हाला माहित असेलच.
एका दानशूर राजाने एकदा लोकांना दान करायचे ठरवले, खूप लोक येवून काही ना काही दान घेऊन गेले.. कपडे, दागिने, धान्य इत्यादी भरपूर साहित्य संपत्ती वाटून झाली. लोकांची दान मागायला यायची संख्या हळूहळू कमी होत गेली तशी राजाने महिन्याच्या शेवटचा दिवस दान करण्याचा शेवटचा दिवस आहे असे जाहीर करून कोणी दान घेऊन गेले नसेल त्यांनी शेवटच्या तारखे चा फायदा घ्यावा असे जाहीर केले. शेवटच्या दिवशी एक खुप कृश दिसणारा आणि खुप गरीब असलेला पण चेहऱ्यावर काही तरी वेगळेच तेज असलेला एक नागरिक दान मागायला आला. क्रमशः.....

''कर्तृत्व, सेवा आणि वात्सल्याचा महामेरू कोसळला''

ज्योतिर्मय साहित्य

पुणे (डॉ. श्यामकांत कुलकर्णी) महाशिवरात्रीच्या पावन दिवशी ठुसे कुटुंबावर दुःखाचा आघात झाला. सर्व स्नेहांकिता मध्ये आधारवड असलेल्या श्रीमती नलिनी ठुसे (वय ८२ वर्षे) यांचे दुःखद देहावसान झाले. पूलाचीवाडी, कांचननगर, डेक्कन भागात वास्तव्यास असलेल्या काकूंनी आपले संपूर्ण आयुष्य रुग्णसेवेच्या व्रताला अर्पण केले. सहनशील स्वभाव, प्रेमळपणा आणि अतिथीशीलता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक पैलू होते. माहेर जुन्नर येथील अष्टेकर परिवारात त्यांचा जन्म झाला. वडील शिक्षक असल्यामुळे विविध ठिकाणी त्यांचे शालेय शिक्षण झाले. पाच भावंडांच्या कुटुंबात वाढलेल्या नलिनीकाकूंनी त्या काळात बोर्ड परीक्षेनंतर ससून हॉस्पिटल येथे नर्सिंगचे शिक्षण घेतले. शिक्षण घेत असतानाच मिळणाऱ्या विद्यावेतनातून त्यांनी लहान भाऊ-बहिणींच्या शिक्षणाचा भार उचलला.

सर्व भावंडांचे शिक्षण पूर्ण करून एक भाऊ वाडिया कॉलेजमध्ये प्राध्यापक झाला, दुसरे बंधू देशाच्या हवाई दलात कार्यरत झाले, तर तिसरे केंद्र शासनाच्या लेखा विभागात राजपत्रित अधिकारी पदावर पोहोचले ही काकूंच्या त्यागाची जिवंत साक्ष होती.

नर्सिंग पदविका संपादन केल्यानंतर त्यांनी काही काळ वाडिया हॉस्पिटल येथे सेवा केली. त्यानंतर पुणे महानगरपालिका अंतर्गत कमला नेहरू रुग्णालय येथे सेवानिवृत्तीपर्यंत प्रामाणिक सेवा बजावली.

सेवाकार्यात असतानाच स्वातंत्र्यसैनिक प्रा. श्री. शिवरामजी ठुसे, प्राध्यापक मॉडर्न कॉलेज, यांच्याशी त्यांचा विवाह झाला. प्रा. ठुसे यांनी नगर हवेली व गोवा मुक्ती संग्रामात सहभाग घेतला होता. सामाजिक बांधिलकी, विद्यार्थ्यांना जीवनदिशा देणारे मार्गदर्शन आणि सेवाभावी वृत्ती हे दोघांचेही

वैशिष्ट्य होते. पुण्यात शिक्षणासाठी आलेल्या अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी आधार दिला; त्यांचे घर जणू वस्तीगृहच बनले होते.

रामजन्मभूमी आंदोलनात ठुसे दांपत्याचा महत्त्वाचा सहभाग होता. त्या काळात पोलिसी अत्याचारात जखमी झालेल्या स्वयंसेवकांची रुग्णसेवा नलिनीकाकूंनी केली.

प्रा. शिवराम काकांच्या वियोगानंतर विद्याधर व धनंजय यांना त्यांनी केवळ माता म्हणूनच नव्हे तर पित्याच्या भूमिकेतूनही प्रेम, शिस्त आणि कर्तव्य शिकवले. शैक्षणिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक संस्कारांची त्यांनी दोघांवर घडण घडवली. माता-पित्याच्या सामाजिक सेवेचा वारसा पुढे नेण्याचे कार्य दोन्ही सुपुत्र निष्ठेने करत आहेत.

''मुले म्हणजे मुद्दल आणि नातवंडे म्हणजे व्याज''या उक्तीप्रमाणे चि. राधा व रेणू यांच्यावर काकूंचे अपार प्रेम व वात्सल्य होते.

गेल्या पाच-सहा वर्षांपासून काकूंच्या प्रकृतीच्या तक्रारी वाढत गेल्या. चि. धनंजय व चि. सौ. अनघा (भारती) यांनी शेवटपर्यंत श्रावणबाळाची भूमिका प्रामाणिकपणे निभावली.

अंत्यविधीच्या वेळी जमलेला अमाप जनसमुदाय म्हणजे काकूंनी आयुष्यात कमावलेली खरी संपत्तीच होती. त्यातील सुमारे एकतृतीयांश उपस्थिती महिलांची होती.

न स्मशाने स्त्रियः कुर्यात् संस्पर्शं वा विलोभनम् ।
चितिधूमविमुक्त्यर्थं तस्मात्ता विनिवर्तयेत् ।।

अर्थ:

स्मशानभूमीत स्त्रियांनी जाणे टाळावे; चितेच्या धुरापासून व त्या जड वातावरणापासून त्यांचे संरक्षण व्हावे, म्हणून त्यांना परत पाठवले जाते.

मात्र काकूंनी आयुष्यभर जपलेले मायेचे मोहळ अंत्यविधीच्या क्षणी अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी निरोप देत होते. चि. राधाचा आक्रोश अंतःकरण पिळवटून टाकणारा होता.

सर्वांचा आधारवड होऊन आयुष्य जगलेल्या नलिनीकाकूंना हिच शब्दांजली समर्पित करतो.

भावपूर्ण श्रद्धांजली डॉ.श्याम कुलकर्णी महाळूंगे पुणे-४५

***

मूल मराठी लेखिका - मंजुषा मुळे हिन्दी भावानुवाद - डॉ. मीना श्रीवास्तव

समवेदना

आगे.....

तेजी से भागने वाले इतने दिनों तक अपनी बेटी के बिछोह के विचार से विचलित होने तक का समय भी नहीं मिल पाया था - परन्तु आज - आज इस घड़ी में, सिर्फ एक ही अनुभूति उसके मन को कचोट रही थी| - एक नन्हीसी कली जैसी उसकी मासूम बिटिया की हर बात, बढती उम्र के साथ बदलती हुई उसकी खिलखिलाती बाललीलाएँ, उम्र की एक एक दहलीज को पार करता उसका कली से फूल में रूपांतरण! फूल में परिवर्तित होते होते उसके बदलते हठ और मांगें! दूसरी तरफ जाने-अनजाने में वृद्धिंगत होती समझदारी, सब कुछ उसकी स्मृति में शीशे की तरह साफ़ दिखाई देने लगा सई को| नन्ही मासूम सलोनी याद आयी, पर याद करना हो तो भूलना पड़ता है| हालत यह थी कि, सलोनी के नन्हे-नन्हे प्यारे बचपन का एक भी पल वह बिसरी ही कहाँ थी, जो उसे याद करना पड़ता? उन यादगार लम्हों को भूलना वैसे भी असंभव ही था| नन्ही सलोनी की वजह से दोनों की दुनिया पूरी तरह बदल चुकी थी- जो ज़िंदगी अब तक निरर्थक और उदास लगती थी, उसे एक नया अर्थ प्राप्त हुआ था| उनके जीवन को मानों एक नई दिशा मिल गई थी|

'सलोनी'... कितना प्यारा और सुन्दर नाम सोचा था उन्होंने उसके लिए। वह नन्हीसी बच्ची थी ही वैसी! मनमोहक गुड़िया जैसी लुभावनी, मुस्कुराती- गेहुँआ रंग, बाएं गुलाबी गाल पर खिली एक छोटीसी डिंपल। बेहद खूबसूरत, पानीदार, भावभीनी मतवाली आँखें - पहली ही नज़र में उसने इन दोनों का मन मोह लिया था|
उसे देखते बराबर ही दोनों ने तुरंत फैसला किया, कि वे अब अन्य बालकों का मुआयना नहीं करेंगे| उन्होंने आश्रम प्रबंधक को अपने फैसले की सूचना दी। कानूनी औपचारिकताएँ पूरी की गईं और वे दोनों उसे लाने के लिए कोजागिरी पूर्णिमा के दिन चले गए। मन पर सम्मिश्र भावनाओं का घना कोहरा छा गया था| भय - दबाव- उत्सुकता- बेचैनी - विषाद और मन ही मन उस मासूम बच्ची की असली माँ के लिए एक गहरी सहानुभूति- वह अभागी माँ कभी भी यह नहीं जान पाएगी कि उसके ही पेट से जन्मी उसकी लाड़ली बिटिया हमेशा के लिए कौनसे पराये लोगों के हाथों में पहुँच जाएगी| सई को इस वास्तविकता पर बहुत रंज हो रहा था- परन्तु इसका कोई इलाज नहीं था। आश्रम की यहीं शर्त थी।

----- आश्रम में पहुँचते बराबर सई ने उस नन्ही कली को गोद में उठा लिया और अनायास ही अपनी ह्रदय से लगा लिया, और बस उसी अंतरंग पल में, मानों उसे विचलित करने वाले विचारों का मन पर हावी हुआ बोझ सदा के लिए उतर गया |

क्रमशः.....





सायकॉलॉजिस्ट : काळाजी गरज...

ज्योतिर्मय साहित्य

मानसशास्त्र () सायकॉलॉजी हे मन व वर्तणूक याचा अभ्यास करणारे विज्ञान आहे. हा शब्द रुडॉल्फ गॉवेल या जर्मन तत्त्वज्ञानाने १६ व्या शतकात तयार केला होता. हा शब्द () सार्रकी व () लोगस या शब्दावरुन आलेला आहे. या ग्रीक शब्दाचा अर्थ आत्म्याचे शास्त्रअसा आहे.

मानसशास्त्राचा अभ्यास हा अधिक सखोल व तत्त्वज्ञानावर आधारित आहे. त्यामुळे सायकॉलॉजी हे एक कलागुणांना आव्हान देणारे, तितकेच अवघड करिअर क्षेत्र आहे. कारण ते सर्वव्यापी आहे. संरक्षण क्षेत्राशी संबंधित प्रत्येक संस्थेत मानसशास्त्र अभ्यासकाचे अत्यंत महत्त्वाचे योगदान आहे. सायकॉलॉजिस्ट लोकांच्या समस्यांवर कौन्सेलिंग व थेरपीच्या मदतीने उपाय सांगतात व ती समस्या गंभीर होण्याच्या आत निवारण्यास मदत करतात.

सम+उप+आदेश (आदेश-अत+ईश) अशा प्राकृत मराठी संधीतून समुपदेशन हा शब्द तयार होतो. याचा अर्थ एखाद्याला उत्तम सल्ला देणे ज्याद्वारे समस्येला पर्याय निवडून सर्वांचाच लाभ होईल.

शरीर व मन यांचा परस्परांशी संबंध आहे. आपले मन विश्वमनाचा एक अंश आहे. एका भरकटलेल्या व्यक्तीला योग्य दिशा समुपदेशकच करु शकतो. काउनसेलिंग ही आता काळाची गरज बनली आहे.

समुपदेशन ही उपचाराची अशी पध्दत आहे की ज्यामध्ये तणावग्रस्त व्यक्तीला समजून घेऊन तसेच आजूबाजूच्या व्यक्तीची परिस्थिती समजून घेऊन, त्या व्यक्तीला स्वत:च्या वैचारिक भावनिक प्रक्रियांमध्ये बदल घडवण्यास प्रवृत्त करुन जीवनातील विविध समस्यांना तोंड देण्याची त्या व्यक्तीची क्षमता वाढवली जाते. त्या व्यक्तीला सक्षम केले जाते.

लहान मुलांच्या समस्या, आर्थिक समस्या, कौटुंबिक समस्या, पती-पत्नीमधील समस्या, वृध्द व्यक्तींच्या समस्या, शारीरिक व मानसिक आजारपणाच्या समस्यांवर मृत्यूची भीती, अपंग मूल अशा सगळ्या प्रश्नांवर एकच उत्तर समुपदेशन. समुपदेशक हा तुमच्या आयुष्याच्या प्रवासातला तुमचा सहप्रवासी असतो. मत न बनवणे, परानुभूती असणे, गोपनीयता राखणे यासाठी तो प्रशिक्षित असतो. तो तुम्हाला स्वत:ला मदत करायला शिकवतो. खरंतर प्रत्येकालाच थोडी फार समुपदेशनाची गरज असते, कारण प्रत्येकाचेच स्वभाव वेगळे असतात. फक्त कमजोर मनाच्या लोकांनाच समुपदेशनाची गरज

असते, असा गैरसमज आहे.

समुपदेशनामुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो. अगदी एखाद्या व्यक्तीला जीवनाबाबत सर्वच स्तरावर अपयश आले. ती एकटी पडली की तिला आत्महत्या करावीशी वाटते. जेव्हा सगळ्या वाटा बंद होतात तेव्हाच व्यक्ती आत्महत्येसारखी टोकाची भूमिका घेते. अशावेळेस तिला समुपदेशकाची गरज असते. त्या व्यक्तीच्या मनात वर्षानुवर्षे साचलेली दु:खे, वादळे सांगण्याकरिता एखाद्या आधाराची गरज असते. वेळीच जर अशा व्यक्तींना समुपदेशक मिळाला तर ती व्यक्ती सकारात्मक होऊन वाचू शकते. समुपदेशन कार्यक्रम हे समाजात राबवले पाहिजेत. उदा. व्यवसाय समुपदेशन कार्यशाळा, व्यक्तिमत्त्व विकास पालकत्व, कुमारावस्थेतील मुलांच्या समस्या, पोस्टपार्टम डिप्रेशनमध्ये जाणवणारा एकटेपणा, रजोनिवृत्तीच्या काळात स्त्रियांमध्ये येणारे नैराश्य व अस्वस्थता कारण हेच प्रमुख महत्त्वाचे घटक आहेत. समुपदेशनाची गरजच काय असा बुरसटलेला समाज विचार करत असतो.

वैवाहिक समुपदेशनामध्ये प्रामुख्याने दोन गोष्टींचा समावेश होतो. विवाहपूर्व समुपदेशन आणि विवाहानंतर समुपदेशन. आजकाल समुपदेशन सर्व स्तरावर अत्यावश्यक झाले आहे. चांगल्या समुपदेशनामुळे जोडीदाराबरोबरचे नातेसंबंध सुधारतात. दररोजची भांडणे कमी होतात. लैंगिक समस्या दूर होतात. पुष्कळ जणांना भीती (फोबिया) असतो. त्यावरही मात करता येते. समुपदेशनात लोकांना बोलते केले जाते. त्यांच्या मनात प्रदीर्घ काळात साचलेल्या कडू आठवणी, अपमान, मनावर झालेले आघात, अप्रिय घटना सर्व लोक व्यक्त करतात आणि मग आजाराचे निदान होते. त्यांच्यावर त्यामुळे झालेले परिणाम समुपदेशकाला लगेच ओळखता येतात. सायकिॲट्रिस्ट व समुपदेशक यांच्यात फरक आहे.

सायकिॲट्रिस्टचे मूळ शिक्षण वैद्यकीय क्षेत्रातले असते. सायकिॲट्रिस्ट या विषयात मुख्यत्वे मेंदूचे कार्य कसे चालते?

सौ. माधुरी पळणिटकर,
सातारा. मो. 9921495533

मेंदूत विचार, भावना, वर्तन याचे होणारे परिणाम व औषध यांचा विचार अधिक खोलवर होतो. औषध मेंदूपर्यंत पोहोचवून आजार बरा करणं खूप आवश्यक असते. मेंदूतली रसायने यांचे नियंत्रण राखून पेशंटला ट्रीटमेंट दिली जाते.

मेंदू आणि त्याचे जीवशास्त्र हा भाग सायकिॲट्रिस्टचा आणि या विषयासंबंधातले सामाजिक परिणाम हा भाग सायकॉलॉजीमध्ये येतो. तुम्ही किती जगलात यापेक्षा कसे जगलात हे जास्त महत्त्वाचे असते. समुपदेशनाचा अवलंब करायला लागणे म्हणजे स्वत:च्या बुध्दिमत्तेची, आत्मविश्वासाची, स्वत्वाची कौटुंबिक एकजुटीची हार आहे असेही बऱ्याच लोकांना वाटते.

शरीरावर खरचटले तर जखम तीव्र होऊ नये म्हणून त्वरित मलमपट्टी करतात पण भावनिक दुखापत झाल्यास भावनिक प्रथमोपचार आणि वैचारिक मलमपट्टी करणे हे गरजेचे मानले जात नाही. विसंगतीचा अभ्यास करुन समुपदेशक समुपदेशनाची प्रक्रिया जबाबदारीने पार पाडतात. समुपदेशकांचा विश्वासपूर्ण नाते जोडण्यावर भर असतो.

समुपदेशन घ्यायची वेळ आपल्या घरातल्या कुणावर आली तर पायाखालची जमीन सरकल्यासारखी वाटते. आपल्या मुलाला किंवा मुलीला समुपदेशनाची आवश्यकता आहे. हा आपला अपराध आहे असंही भावनाशील पालकांना वाटते.

एखादं होकायंत्र दिशा दाखवतं तसेच समुपदेशक सर्व गरजू लोकांना मदत करतात. आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल, संगणक, इंटरनेट इत्यादी दृकश्राव्य साधनांद्वारे नको ते विषय विद्यार्थ्यांच्या दृष्टिक्षेपात येतात. त्यामुळे ते बाह्य प्रलोभनांना बळी पडतात. कधी कधी गैर मार्गाकडे आकृष्ट होतात. सततच्या परीक्षा, खासगी वर्ग, खेळण्यावर मर्यादा, मित्र-मैत्रिणीत होणारी तुलना, पालकांचे दुर्लक्ष इत्यादी कारणांमुळेही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वैयक्तिक जीवनात समस्या निर्माण होतात. त्यांना समुपदेशनाची नितांत आवश्यकता असते.

प्रसिध्द मानवशास्त्रज्ञ सर एडवर्ड बर्नेट टायलर यांच्या मते स्वत:चे व्यक्तिमत्त्व व स्वत:मधील गुणांचा उपयोग प्रगतीशील अडथळे दूर करण्यासाठी कसा करता येईल याचा शोध घेण्यासाठी व्यक्तीस मदत करणे हे समुपदेशकाचे काम होय. मार्गदर्शन व सहकार्य करण्याची आवड, आत्मविश्वास, सहनशीलता इत्यादी गुणांमुळे समुपदेशकाचे व्यक्तिमत्त्व प्रत्ययास येते. त्यामुळे अगदी मोठमोठ्या कंपन्यांमध्येही कामगार आणि मालक यांच्यातही समुपदेशनाची आवश्यकता वाढली आहे.

(क्रमशः)

सेवा-सहयोग फाऊंडेशन द्वारा आयोजित सेवा फेस्ट २०२६ उत्साहात

विविध स्टॉल्स ला सात हजारापेक्षा जास्त नागरिकांची सहकुटुंब भेट

ज्योतिर्मय साहित्य

पुणे - संयुक्त राष्ट्र संघाने २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संघ ''इंटरनॅशनल इयर ऑफ वोलून्टीरिंग'' म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर सेवा सहयोग फाउंडेशन आयोजित ''सेवा फेस्ट २०२६ उत्सव सेवेचा'' हा भव्य सामाजिक महोत्सव शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी सिंहगड रोड येथील ''कलाग्राम'' येथे उत्साहात संपन्न झाला. सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत चाललेल्या या सेवा- फेस्ट २०२६ उत्सवाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, स्वयंसेवक, सामाजिक संस्था प्रतिनिधी, सीएसआर अधिकारी तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात विविध सेवा क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांच्या प्रेरणादायी मनोगतांनी झाली.याप्रसंगी गरवारे टेक्निकल कॉलेजचे अध्यक्ष विवेक कुलकर्णी पुणे, विनोद जाधव के.जे. ग्रुप ऑफ इंजिनियरिंग पुणे, प्रवीण कुलकर्णी प्लांट डी.सी. हेड, इन्फोसिस, सेवा सहयोग फाउंडेशनचे संचालक किशोर मोघे,सेवा फेस्ट २०२६ चे प्रकल्प समन्वयक विनीत कोंडेजकर यांची मुख्य उपस्थिती होती.

उद्घाटनपर भाषणात प्रवीण कुलकर्णी यांनी आपल्या मनोगतात स्वयंसेवकांनी कुटुंबासोबत सेवा उपक्रमांमध्ये सहभागी व्हावे, यावर विशेष भर देत असे नमूद केले की, यामुळे कुटुंबासाठीचा वेळ कमी होत नाही, उलट मुलांना लहानपणापासून स्वयंसेवेचे महत्त्व समजण्यास आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव विकसित होण्यास मदतच होते.

''समुत्कर्ष'' प्रकल्पांतर्गत लाभार्थी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सृजनशील सादरीकरणांनी उत्सवाची प्रेरणादायी सुरुवात झाली.

उत्सवादरम्यान ''किशोरी विकास'' माहिती पुस्तिका,''चेतना'' प्रकल्प विभागाचे पुस्तक तसेच ''महिला सक्षमीकरण दशकपूर्ती'' पुस्तिकेचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.महिला बचत गटांनी तयार केलेल्या हस्तकला वस्तू व खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सना प्रचंड प्रतिसाद मिळाला.

सेवा- सहयोग अंतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांचे एकूण ३९ स्टॉल्स उभारण्यात आले होते.जवळपास सात हजारांहून अधिक नागरिकांनी आपल्या कुटुंबासह भेट देत विविध उपक्रमांची माहिती घेतली व अनुभव नोंदवले.

सेवा फेस्ट २०२६ उपक्रमामध्ये ''सी. एस.आर मीट'',''एज्युकेशन मीट'' तसेच ''सेवा कट्टा'' या मुक्त संवाद सत्रांतून सामाजिक क्षेत्रातील विविध विषयांवर चिंतन व मार्गदर्शन झाले. विविध प्रकल्पांची माहिती, यशोगाथा, प्रदर्शन आणि चर्चासत्रांमुळे सेवा क्षेत्रातील समस्या व उपाययोजनांवर सखोल चर्चा झाली. या उत्सवातून स्वयंसेवकांचा ध्यास,समर्पण आणि समाजाप्रती असलेली बांधिलकी प्रकर्षाने जाणवली.

उत्सवा दरम्यान विविध सत्रांमध्ये उपस्थित सर्व सहभागी व भेट देणाऱ्या नागरिकांनी समाजाच्या भल्यासाठी शाश्वत बदल घडविण्यासाठी सक्रिय सहभाग घेण्याची ''सेवा प्रतिज्ञा'' देखील यावेळी घेण्यात आली

या उपक्रमास खासदार मेधा कुलकर्णी,नगरसेवक कुणाल टिळक,प्रसिद्ध लेखक व दिग्दर्शक किरण यज्ञोपवित यांनी भेट दिली व सेवा - सहयोग सातत्याने राबवित असलेल्या समाजकार्याची प्रशंसा केली.

''सेवा- फेस्ट २०२६'' हा केवळ एक कार्यक्रम नसून, समाजातील माणसांना माणसांशी जोडणारी आणि स्वयंसेवेची प्रेरणा देणारी सशक्त चळवळ ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

सद्गुरू दत्तात्रेयांच्या मूर्तीसाठी चांदीचा मुकुट अर्पण

ज्योतिर्मय साहित्य

पुणे : बावधन परिसरातील ग्लोरीया ग्रेस येथे वास्तव्य करणारे ज्येष्ठ नागरिक निवृत्त प्राध्यापक डॉक्टर दत्ताजी पाच खेडे यांनी त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने सद्गुरु दत्तात्रेयांच्या मूर्तीसाठी चांदीचा मुकुट आज विश्वस्तांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

महाशिवरात्रीच्या शुभमुहूर्तावर मुकुट प्रदान करण्याचा हा कार्यक्रम बावधन खुर्द परिसरातील श्री दत्त मंदिर येथे उत्साहाने पार पडला.

श्री दत्ताजी पाचखेडे यांनी हा चांदीचा मुकुट सर्वश्री काशिनाथराव दगडे पाटील आणि बबनराव दगडे



पाटील या दोन विश्वस्तांच्या उपस्थितीत त्यांना प्रदान केला याप्रसंगी भगवान शंकर महादेव तसेच दत्तात्रेय सद्गुरु आणि प्रभू रामचंद्राची भजने गायली गेली आणि अध्यात्मिक प्रवचनाचाही सोहळा पार पडला प्राध्यापक डॉक्टर विल धारूरकर यांनी महाराष्ट्रातील दत्त संप्रदाय या विषयावर थोडक्यात विवेचन केले.

या कार्यक्रमासाठी ग्लोरीया ग्रेस मधील दत्ताजी पाचखेडे मित्र मंडळाचे सदस्य तसेच ग्लोरीया प्रबोधन मंच चे सर्व प्रतिनिधी बहुसंख्येने उपस्थित होते. यामध्ये श्री विजय मातेकर, श्रीनिवास तीघरे, विकास टिकेकर, चिंतामणी पांचोली,

श्री सुरेश राव जोशी, डॉ. विजय धारूरकर इत्यादी उपस्थित होते. याप्रसंगी पाचखेडे यांचे जामातटिकेकर तसेच श

श्री मुकेश कुलकर्णी आणि डॉ केमकर हे उपस्थित होते या मुकुट प्रदान समारंभ प्रसंगी विश्वस्त दगडे बंधूंनी पाच खेडे यांचे विशेष आभार मानले तर याप्रसंगी ग्लोरीया प्रबोधन मंचच्या वतीने श्री विजय मातेकर यांनी सर्व विश्वस्तांना आणि उपस्थितांना धन्यवाद दिले व कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

चाहुलींचे अनवट नाद - सम काळातील मानवी वर्तन व्यवहाराचा ताळेबंद मांडणारी कविता

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर - स्त्रियांच्या विदीर्ण वर्तमानाला अर्थ देऊ पाहणारी ही कविता विविध स्वरूपाच्या मानसिक परात्मतेचा पट मांडते.

या कवितेतील अनुभव वरवर निखळ स्त्रीलक्षी भाषेत असले तरी त्यात काळाची, प्रवृत्तीची आणि प्रकृतीची असंख्य वलये सामावलेली आहेत. स्त्रीत्वाच्या सर्वस्पर्शी अनुभवांना मांडतानाच समकालीन पुरुषी मनो व्यवहारांवर आणि राजकारणावरही ही कविता भाष्य करते.हे पी विठ्ठल सरांनी केलेले भाष्य आहे.

तर अध्यक्षीय समारोपात ललिता गादगे म्हणतात, ही कविता रुढी परंपरा नाकारणारी जेवढी आहे तेवढीच रुढीपरंपरा नाकारलेल्या स्त्रीच्या घुसमटीची ही कविता असून

आजच्या बदलत्या स्त्री जाणिवांना कवेत घेणारी आहे. तरुणींनी ही कविता जरूर

वाचावी अशा यातल्या शेवटच्या टप्प्यातल्या कविता आहेत.

संग्रहाचे प्रकाशन कवयित्रींच्या आई मालती राघवेंद्र मुरुगकर यांच्या हस्ते झाले असून मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ.सर्जेराव जिगे हे प्रमुख पाहुणे होते.

काळा बरोबर कवयित्री प्रिया धारूरकर यांची कविता सुद्धा बदलत गेलेली आहे.पहिल्या कवितासंग्रहापासून या कवितासंग्रहा पर्यंतचा कवितेचा प्रवास अधिक प्रगल्भतेने झाला आहे.असे डॉ. जिगे यांनी प्रतिपादित केले आहे.

कवी विजयकुमार पांचाळ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर आभार कवी सुनील उबाळे यांनी मांडले.

कार्यक्रमास डॉ.छाया महाजन, डॉ. प्रेमला मुखेडकर डॉ.संतोष देशमुख, डॉ.ललित अधाने, कवयित्री रंजन कंधारकर, शमा बर्डे, रसिका देशमुख, प्रशांत गौतम, मनोज कुलकर्णी, अनुपमा मोघे, संगीता खोले अनेक मान्यवर कवी लेखक रसिक यांची उपस्थिती होती.डॉ.संतोष दहिफळे, कवी सुशील सातपुते तसेच शहरातील मान्यवर उमेश देव, पंकज कुबेरकर यांचीही उपस्थिती होती.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559